# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रसिद्धी पत्रक

- मिरा भाईंदर महानगरपालिका अभियंता प्रशिक्षण संप्पन्न
- कार्यक्षमता वृद्धी आणि कौशल्या विकासासाठी 'सक्षम  उपक्रम

मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या कौशल्य विकासासाठी आणि कार्यक्षमता वृद्धीसाठी 'सक्षम – एम्पावरींग एमबीएमसी वर्कफोर्स' या विशेष प्रशिक्षण उपक्रमाचा शुभारंभ ७ मार्च २०२५ रोजी झाला. उपक्रमाच्या पहिल्या सत्रात बांधकाम विभागातील अभियंत्यांसाठी आयआयटीचे तज्ज्ञ प्राध्यापक धरमवीर सिंह यांनी मार्गदर्शन केले आहे.

मिरा भाईंदर महापालिकेच्या नाविन्यता कक्षामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत असून त्यांना चांगले यश मिळत आहे. या उपक्रमांमुळे महानगरपालिकेचा कारभार गतीमान झाला आहे. आता नाविन्यता कक्षामार्फत कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृद्धी आणि कार्यक्षमतेसाठी 'सक्षम – एम्पावरींग एमबीएमसी वर्कफोर्स' या विशेष प्रशिक्षण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाची सुरुवात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांसाठी विशेष प्रशिक्षण सत्राने झाले आहे.

या पहिल्या प्रशिक्षण सत्रात आयआयटी मुंबईचे प्राध्यापक धर्मवीर सिंह यांनह 'कॉंक्रीट अँड क्वॉलिटी ऑफ बिटुनिमस अँड कॉंक्रीट रोड्स विद टेक्नॉलॉजी एडव्हान्समेंट' या महत्त्वाच्या विषयावर मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनामुळे अभियंत्यांना रस्त्यांची गुणवत्ता टिकवणे, योग्य मटेरियलची निवड, क्रॉस-सेक्शन डिझाईन, आणि कामाच्या वेळी उद्भवणाऱ्या अडचणींवर उपाय आदींबाबत माहिती मिळाली आहे, सदरची माहिती महानगरपालिकेचे शहर अभियंता दिपक खांबित यांनी दिली.

'सक्षम – एम्पावरींग एमबीएमसी वर्कफोर्स' हा मिरा भाईंदर महापालिकेच्या उपक्रमाचे व्यवस्थापन महानगरपालिकेचे नाविन्यता कक्ष करत आहे. या अंतर्गत महापालिकेच्या विविध विभागांसाठी कौशल्य विकास आणि क्षमता वृद्धी प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे.  या उपक्रमामार्फत, कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक प्रभावी सेवा देण्यास सक्षम करणे, त्यांचे तांत्रिक ज्ञान वाढवणे आणि शहराच्या विकासाच्या प्रक्रियेत सकारात्मक बदल घडविण्यात येणार आहे. येत्या नजिकच्या भविष्यात विविध विभागांसाठी अशाच उपयुक्त 'सक्षम' प्रशिक्षण सत्रांचे आयोजन केले जाणार आहे.

'सक्षम' प्रशिक्षण उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक ज्ञानात तसेच संपूर्ण प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ होईल. यामुळे नागरिकांना अधिक चांगल्या आणि दर्जेदार सेवा मिळतील आणि शहराचा विकास अधिक वेगाने होईल, असे अतिरिक्त आयुक्त डॉ सचिन बांगर यांनी सांगितले.